दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

स्वतःला कमकुवत समजणे हे सर्वात मोठे पाप आहे.




■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 3 ■ मंगळवार, 24 मार्च 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

# महावितरणच्या कामांतील बोगसगिरीवर आमदार कैलास पाटील यांचा हल्लाबोल

## खासगी कामगारांच्या मृत्यूंना जबाबदार कोण ?

### विधानसभेत सरकारला सवाल

**आरंभ मराठी । धाराशिव**

महावितरणच्या सबस्टेशन मेंटेनन्ससह विविध तांत्रिक कामांमध्ये सुरू असलेल्या गंभीर अनियमितता, बोगस कामे आणि निष्काळजीपणामुळे घडणाऱ्या अपघातांचा मुद्दा आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात तीव्रतेने उपस्थित केला. काम महावितरणचे, पण जीव जातो तो खाजगी कामगारांचा, मग जबाबदारी नेमकी कोणाची?, असा सवाल त्यांनी उपस्थित करत शासनाला धारेवर धरले. सबस्टेशन मेंटेनन्ससाठी ठराविक एजन्सींची नियुक्ती असतानाही त्या संबंधित अधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर बसवत असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत आमदार कैलास पाटील यांनी सरकारला महावितरणच्या संदर्भात सवाल केले. आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांना आवश्यक परमिट न देता कामे करवून घेतली जात असल्याने प्रत्यक्ष काम



कोण करतो, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.परिणामी नियमबाह्य पद्धतीने कामे होत असून अपघातांची मालिका सुरूच आहे, अशी टीकाही त्यांनी केली.याहून गंभीर बाब म्हणजे महावितरणची कामे मोठ्या प्रमाणावर खाजगी व्यक्तींमार्फत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. या कामगारांकडे ना पुरेशी सुरक्षा साधने आहेत, ना योग्य प्रशिक्षण. अपघात झाल्यास कोणतीही मदत




किंवा नुकसानभरपाई मिळत नसल्याने कामगारांचे जीवन धोक्यात आले आहे. दररोज अपघात होऊन जीवितहानी होत असल्याने ही केवळ निष्काळजीपणा नसून व्यवस्थेचे अपयश असल्याचा आरोप त्यांनी केला.या पार्श्वभूमीवर आमदार पाटील यांनी मागण्या मांडल्या. महावितरणच्या प्रत्येक अपघाताची स्पष्ट जबाबदारी निश्चित करावी, बोगस कामे व बिलांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांना आवश्यक परमिट व सुरक्षा साधने तातडीने उपलब्ध करून द्यावीत, तसेच मृत कामगारांच्या कुटुंबांना तात्काळ व योग्य नुकसानभरपाई देण्याचे धोरण जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली.अन्यथा ही बोगसगिरी आणि निष्काळजीपणाचा खेळ थांबणार नाही आणि निष्पाप कामगारांचे बळी जात राहतील, असा इशाराही आमदार कैलास पाटील यांनी दिला.

# सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश द्यावा

### नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांची मागणी




**आरंभ मराठी । भूम**

भूम नगर परिषदेत उद्या होणाऱ्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना पत्र देऊन आपली मागणी अधिकृतपणे मांडली आहे. नगर परिषदेत होणाऱ्या सर्वसाधारण सभांमध्ये विविध महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. हे निर्णय पारदर्शकपणे नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी पत्रकारांची उपस्थिती अत्यावश्यक असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले. लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून नागरिकांना अचूक व विश्वासार्ह माहिती देण्याचे काम पत्रकार करत असतात. त्यामुळे सभेत पत्रकारांना प्रवेश नाकारल्यास पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे 25 मार्च रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश देऊन लोकशाही मूल्यांचे पालन करावे, अशी मागणी नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# 2020 च्या पीक विमा प्रकरणात पुन्हा 'तारीख पे तारीख'; आता 15 एप्रिल रोजी पुढील सुनावणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

खरीप 2020 हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबतच्या पीक विमा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात 23 मार्च रोजी झालेल्या सुनावणीत कोणताही अंतिम निर्णय न देता पुढील सुनावणी 15 एप्रिल रोजी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील साडेतीन लाख शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या विमा रकमेकरिता पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार आहे. 2020 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेती पिकांचे मोठ्या




प्रमाणावर नुकसान झाले होते. मात्र, प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत विमा कंपनीकडून अत्यल्प रक्कम वितरित करण्यात आली. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती रक्कम देण्याचे निर्देश दिले होते; परंतु आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने प्रकरण न्यायालयात गेले. प्रथम उच्च न्यायालयात आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावण्यांमध्ये न्यायालयांनी शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 18 हजार रुपये मदत देण्याचे आदेश विमा कंपनीला दिले होते. त्या अनुषंगाने सुमारे 376 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे; मात्र अजूनही अंदाजे 225 कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळणे बाकी आहे. विमा कंपनीने निकालाला आव्हान देत पुन्हा याचिका दाखल केली होती. त्यावर 24 नोव्हेंबर 2025 रोजी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने 24 जानेवारी 2026 पर्यंत प्रलंबित रक्कम वितरित करण्याचे आदेश दिले होते. तरीही निधी वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले. विमा कंपनीने यापूर्वी 75 कोटी रुपये न्यायालयात जमा केले होते. त्या रकमेवरील सुमारे 17 कोटी रुपये व्याजासह एकूण 92.93 कोटी रुपये जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. दरम्यान, राज्य सरकारकडून विमा कंपनीला देय असलेले 134 कोटी रुपये 11 फेब्रुवारी रोजी वर्ग केल्याचे पत्र देण्यात आले असले, तरी प्रत्यक्ष जमा होण्यात विलंब झाल्याने प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. विशेष म्हणजे, या 134 कोटी रुपयांवर कोणतीही स्थगिती नसताना त्याचे तात्काळ वाटप करण्यात यावे, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. सुनावणी पुन्हा लांबल्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. 'तारीख पे तारीख' अशी स्थिती निर्माण झाल्याने आता 15 एप्रिलच्या सुनावणीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




# धाराशिवच्या मातीतून उगवलेले 'आरंभ मराठी' राज्यभर झळकणार

### 'आरंभ मराठी'च्या वर्धापनाला मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

### लवकरच 'आरंभ मराठी'चा छापील अंक घराघरात पोहोचणार

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिवच्या मातीतून उगम पावलेले 'आरंभ मराठी' हे वृत्तपत्र राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्येही आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करेल आणि रोज नवी बातमी, नवा विचार देत राहील, असे गौरवोद्गार धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी काढले. दैनिक 'आरंभ मराठी'च्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी (दि.२२) शहरातील भोसले हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित स्नेह मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा नेहाताई राहुल काकडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील, 'आरंभ मराठी'चे संपादक चंद्रसेन देशमुख तसेच कार्यकारी संपादक सज्जन यादव उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वर्धापन विशेषांकाचे थाटात प्रकाशन करण्यात आले.यावेळी दास पाटील लिखित, खंडेराव मुळे यांनी गायलेले व संगीतबद्ध केलेले 'आरंभ मराठी'चे शीर्षक गीतही लॉन्च करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. प्रास्ताविक संपादक चंद्रसेन देशमुख यांनी केले. आरंभ मराठी सुरू करण्यापासून ते दोन वर्षांचा प्रवास त्यांनी सांगितला. माध्यम म्हणून दोन वर्षात जबाबदारीने काम करून विश्वासार्ह बातम्या देण्याचा प्रयत्न केला आणि पुढेही तो सुरू राहील असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी लवकरच आरंभ मराठी दैनिकाचा छापील अंक घराघरात मिळेल अशी घोषणा केली.जिल्हाधिकारी पुजार यांनी आपल्या भाषणात माध्यमांच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना सांगितले की, काळाच्या ओघात माध्यमांनी स्वतःमध्ये बदल घडवणे अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी आपण वृत्तपत्रांद्वारे दैनंदिन घडामोडी जाणून घेत होतो, मात्र आता डिजिटल मीडियाचा काळ आला आहे. या बदलत्या युगात अनेक माध्यमे स्वतःला अद्ययावत




करण्यात मागे पडतात, मात्र 'आरंभ मराठी' हे असे माध्यम आहे ज्याने काळानुसार स्वतःला सक्षमपणे अपग्रेड केले आहे. डिजिटल माध्यमांसोबतच जुन्या वाचकांची गरज ओळखून प्रिंट आवृत्तीही सुरू ठेवणे, ही 'आरंभ मराठी'ची मोठी जमेची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यात माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रशासनाचे कार्य अधिक सुलभ होते आणि जनतेच्या अडचणी व गरजा स्पष्टपणे समोर येतात. प्रशासनात जबाबदारीच्या पदावर काम करत असताना माध्यमांनी केलेले मार्गदर्शन आम्हाला काम करण्यासाठी प्रेरणा देत असल्याचेही त्यांनी सांगितले. केवळ दोन वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वृत्तपत्राला एवढी लोकप्रियता मिळवणे सोपे नसते, मात्र 'आरंभ मराठी'ने वाचकांच्या मनात आपले स्थान निर्माण करून यशाचे शिखर गाठले आहे, असे पुजार म्हणाले. तसेच हे वृत्तपत्र राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही आपले स्वतंत्र

सविस्तर पेज ३ वर..



# तुळजापूरच्या रंगभूमीला नवी उभारी, अद्यावत नाट्यगृह उभारणार

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची ग्वाही

आरंभ मराठी । तुळजापूर

**तुळजापूरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा निर्णय जाहीर करत शहरात सर्व सोयींनी युक्त असे अद्यावत वातानुकूलित नाट्यगृह उभारण्यात येणार असल्याची ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि नाट्यचळवळीला चालना मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**





'पंचरंग प्रतिष्ठान' आयोजित राज्यस्तरीय 'पंचरंग करंडक' एकांकिका लेखन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात त्यांनी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधत ही घोषणा केली. हॉटेल स्कायलँड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात निवडक एकांकिकांच्या 'अंकुर' या संग्रहाचे प्रकाशनही उत्साहात करण्यात आले. आई तुळजाभवानीच्या पावन भूमीत साहित्याचा जागर होणे ही अभिमानाची बाब आहे. नवोदित लेखकांना संधी देत दर्जेदार नाट्य साहित्य रंगभूमीपर्यंत पोहोचवण्याचे काम या उपक्रमातून होत आहे, असे प्रतिपादन आमदार पाटील यांनी यावेळी केले. तुळजापूरची साहित्यिक आणि सांस्कृतिक पताका अधिक उंचावणार असल्याचाविश्वासहीत्यांनीव्यक्तकेला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख, ख्यातनाम सिने गीतकार व नाट्यलेखक प्रा. डॉ. दासू वैद्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली. व्यासपीठावर नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, अभिनेते उमेश जगताप व शंतनू गंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात पंचरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत नाडापुडे, सचिव संभाजीराव भोसले, उपाध्यक्ष सचिन घोडके, संयोजक महेश धुमाळ व दिग्विजय भोसले यांच्यासह साहित्य व नाट्य क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजेत्या लेखकांचा गौरव करण्यात आला तसेच 'अंकुर' संग्रहात स्थान मिळवलेल्या साहित्यकृतींचे विशेष अभिनंदन करण्यात आले. याशिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा जाहीर सत्कार करण्यात आला. तुळजापूरच्या सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा देणारा हा सोहळा ठरला.

# बालसुरांनी भारावली बासरी सभा; गुरुकुलात संगीताचा मधुर सोहळा

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव शहरातील गुरू-शिष्य परंपरेला साजेशा वातावरणात बासरीच्या सुरांनी भारलेली संगीत सभा उत्साहात पार पडली. महर्षि दधिची फाऊंडेशन, धाराशिव संचलित गुरुकुल संगीत संस्कार विद्यालयात २२ मार्च २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमाने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ कला प्रेमी दानवे मॅडम यांच्या हस्ते भगवान पांडुरंगाच्या पूजनाने झाली. बासरी वादक व प्रशिक्षक जगदीश सुतार यांनी स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. सूत्रसंचालनाची जबाबदारी बालकलाकार श्रेयस होळकर यांनी समर्थपणे सांभाळली.या सभेत बालकलाकारांनी वैयक्तिक आणि समूह सादरीकरणातून शास्त्रीय व सुगम संगीताचे सुंदर दर्शन घडवले. पहिलीत शिकणाऱ्या लहानग्यांपासून ते प्रौढ संगीतप्रेमींपर्यंत सर्वांनी सहभाग नोंदवत बासरीच्या सुरांनी वातावरण भारून टाकले. अभिनंदन दानवे, राघव टेकाळे, वेदांती टेकाळे, श्रेयस होळकर, तानिया शहा, श्रेयस सुरवसे आणि श्रीकांत राऊत यांनी आपल्या सादरीकरणातून विशेष दाद मिळवली.राग भूपाली, राग यमन, राग देस, राग दुर्गा, राग यमन कल्याण यांसारख्या रागांवर आधारित रचना सादर करत कलाकारांनी शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा उलगडली. तसेच 'श्री कृष्ण गोविंद हरे मुरारी'सारख्या भजनांनी सभागृहात भक्तीभावाची लहर निर्माण केली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी गणिततज्ज्ञ व संगीतप्रेमी प्रा. प्रसाद माशाळकर यांनी आपल्या जीवनातील सांगीतिक अनुभव शेअर करत उपस्थितांना प्रेरित केले. शेवटी बालकलाकारांचा सत्कार व पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी जगदीश सुतार यांनी संगीताचे महत्त्व अधोरेखित करत लेकरांच्या हातात मोबाईल न देता बासरी द्या,असे आवाहन केले. कार्यक्रमास प्रशांत कुडाळ, प्रसाद माशाळकर, शुभम बनकर तसेच विविध कुटुंबीय व संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापुरात इंद्रायणी हिंदू संमेलन उत्साहात 'पंच परिवर्तन' अंगीकारण्याचे आवाहन




आरंभ मराठी । तुळजापूर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मागील शंभर वर्षांत हिंदू समाजाच्या संघटनासाठी सातत्याने कार्य केले असून, सर्वसामान्य नागरिकांनी 'पंच परिवर्तन' अंगीकारल्यास समाजातील अनेक प्रश्न आपणच सोडवू शकतो, असे प्रतिपादन सेवा भारतीचे अखिल भारतीय सह संघटन मंत्री विजयराव पुराणिक यांनी केले. येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात आयोजित इंद्रायणी हिंदू संमेलनात ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुजारी नगर फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प. पांडुरंग रेड्डी महाराज उपस्थित होते. प्रारंभी संस्कार भारती देवगिरी प्रांताचे सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांचे स्वागत गणेश पुजारी यांनी केले. संमेलनाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. आपल्या भाषणात पुराणिक यांनी प्रत्येक व्यक्तीने आपल्या लहान-लहान कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'पंच परिवर्तन' समजून घेऊन त्याचा अंगीकार केल्यास समाजातील अनेक समस्या सहज सोडवता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी ह.भ.प. पांडुरंग रेड्डी महाराज यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश पुजारी, उपाध्यक्ष महेश कांबळे, कोषाध्यक्ष औदुंबर वाघे, संरक्षक बालाजी नरवाडे, सचिव रितेश कवडे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन लक्ष्मीकांत सुलाखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीकांत कावरे यांनी केले.

# रक्तदानाचा 19 वर्षांचा यज्ञ; पारगावात 40 दात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



आरंभ मराठी । पारगाव

राष्ट्रसंत तुकाराम महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त तसेच भगतसिंग, सुखदेव थापर आणि शिवराम राजगुरू यांच्या शहिद दिनानिमित्त वाशी तालुक्यातील पारगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला यावर्षीही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गेल्या सलग 19 वर्षांपासून सुरू असलेल्या या सामाजिक उपक्रमाने यंदाही मानवतेचा संदेश देत यशस्वीपणे वाटचाल कायम ठेवली. या रक्तदान यज्ञात यावर्षी एकूण 40 रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. कार्यक्रमाचे आयोजन पारगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व युवकांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते, या भावनेतून युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्याच बरोबर या शिबिरात महिलांचा ही मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला.अनेक तरुणांनी प्रथमच रक्तदान करून समाजासाठी योगदान दिले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बीड येथील सिटी ब्लड बँकेच्या वैद्यकीय पथकाने विशेष सहकार्य केले. रक्तदात्यांची तपासणी, सुरक्षित रक्तसंकलन व आवश्यक सुविधा यांची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी आयोजकांनी सांगितले की, 'रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे प्रत्येकाने वर्षातून किमान एकदा रक्तदान करावे,' असा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे पारगाव परिसरात सामाजिक जाणीव वाढीस लागून युवकांमध्ये सेवाभाव रुजत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या कार्यक्रमाच्या उदघाटनावेळी संत तुकाराम महाराज,छत्रपती संभाजी महाराज, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या एकत्रित असलेल्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आली.यावेळी डॉ.चंद्रशेखर कोकणे,डॉ. प्रशांत मोटे,बाबासाहेब रोटे,सोनाली रोटे,यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम सुरू करण्यात आला.रोटे दाम्पत्याने सोबत रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. यावेळी कॉ.पंकज चव्हाण,प्रदीप मोटे,किशोर उंदरे देशमुख,बालाजी गिराम,सलीम शेख,अमोल गायकवाड, उमेश आखाडे,महादेव मोटे,प्रकाश मोटे,माऊली ताटे,पत्रकार राहुल डोके,सुरेश लाखे,सारंग मोटे,संपत काटवटे, सुशांत कोकणे,संतोष चौधरी,अशोक भोरे,किशोर इंगळे,विनायक आखाडे, विशाल खवले, सुनील गायकवाड,बबन फुलवरे,राजू पठाण,विशाल गायकवाड,लहू छंनू पवार,नितीन माने,बिभीषण कोकाटे,ऋतुपर्ण गालफडे,त्याच बरोबर जयश्री माने,सुनीता घुले,अलका काटवटे, हावळे मॅडम,व गावातील तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यात दिमाखदार सोहळ्यात अमरसिंह देशमुख यांना 'ग्रीन वर्ल्ड प्राईड ऑफ महाराष्ट्र' पुरस्कार प्रदान



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील काटीचे सुपुत्र आणि धाराशिव येथील प्रसिद्ध 'सन ग्रुप' उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अमरसिंह बाजीराव देशमुख यांना रविवारी पुण्यात आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात 'ग्रीन वर्ल्ड प्राईड ऑफ महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. औद्योगिक क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची दखल घेत हा राज्यस्तरीय गौरव करण्यात आला आहे. नऱ्हे, पुणे येथील ॲड. शार्दुलराव सुधाकरराव जाधववर शैक्षणिक संकुलात २२ मार्च रोजी हा सोहळा पार पडला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या शुभहस्ते आणि मृदा व जलसंधारण मंत्रालयाचे सचिव सुनील चव्हाण (IAS), तसेच पुणे आयकर आयुक्त अजय केसरी (IRS) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार अमरसिंह देशमुख यांना प्रदान करण्यात आला. याप्रवेळी ग्रीन वर्ल्ड फाउंडेशनचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते अमरसिंह देशमुख यांनी अत्यंत मेहनतीने आणि कल्पकतेने 'सन ग्रुप'च्या माध्यमातून उद्योजकतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाने केवळ काटी गावाचेच नव्हे, तर संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उंचावले आहे. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी हा सन्मान आपल्या कर्मभूमीला आणि मार्गदर्शकांना समर्पित केला. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रीन वर्ल्ड आणि जाधववर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान १० हजार पुस्तकांच्या मोफत वाटप उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला. अमरसिंह देशमुख यांच्या या यशाबद्दल जिल्हाभरातून आणि विशेषतः काटी ग्रामस्थांकडून त्यांचे मोठ्या उत्साहात अभिनंदन केले जात आहे.

## पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांचे निधन



**अणदूर** :- जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य तथा पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांचे रविवारी (दि.२२) मध्यरात्री सोलापूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 46 वर्षे होते. शोषित, पीडित व वंचित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, सामाजिक भान जपणारे प्रामाणिक पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. वृक्षमित्र म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी हळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार असून त्यांच्या अकाली निधनाने अणदूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आरंभ मराठी

## एसटी ताफ्यात तीन हजार अत्याधुनिक स्मार्ट बसेसची भर

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे लोकार्पण

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

आरंभ मराठी । मुंबई






महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि.२४) विधिमंडळाच्या प्रांगणात होणार आहे. या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, 'राजमाता जिजाऊ' बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल तीन हजार 'राजमाता जिजाऊ' या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. या बसेसना 'राजमाता जिजाऊ' हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गौरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले. या बसेसमध्ये ३+२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे. या बसमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे. यातील पहिल्या ५० बसेस नागपूर येथे दाखल होणार असून, तेथून या नव्या सेवेला प्रारंभ करण्यात येणार आहे.

# बावची येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सुरुवात

आरंभ मराठी । परंडा



परंडा तालुक्यातील बावची येथील श्री दत्त मंदिर, गवारे वस्ती येथे अखंड हरिनाम सप्ताह व गुरूचरित्र पारायण सोहळ्याला उत्साहात सुरुवात झाली असून भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यंदा या सप्ताहाचे २३ वे वर्ष आहे. ब्रह्मलीन परमपूज्य रामानंद सरस्वती महाराज व ह.भ.प. भाऊसाहेब भोसलेकर महाराज यांच्या कृपाशिर्वादाने आयोजित या सप्ताहात काकडा भजन, दत्त आरती, पारायण, प्रवचन, हरिपाठ व कीर्तन असे विविध कार्यक्रम होत आहेत. दुसऱ्या दिवशी ह.भ.प. मुकुंद महाराज तरंगे यांच्या हरिकिर्तनाने वातावरण भक्तिमय झाले. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून सेवाभाव, निष्ठा व भक्तीचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. शुक्रवार दिनांक २७ मार्च रोजी दिंडी प्रदक्षिणा, काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असून आयोजनासाठी स्थानिक मंडळे व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra)._
विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्यूशन, ऑफिस नंबर यूजी ०७, स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर arambhmarathi535@gmail.com

# द्वितीय वर्धापन दिनानिमित्त दैनिक 'आरंभ मराठी' वर कौतुकाचा वर्षाव
























पेज १ वरून..

## धाराशिवच्या मातीतून उगवलेले 'आरंभ मराठी' राज्यभर झळकणार

स्थान निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषद सीईओ डॉ. मैनाक घोष यांनी माध्यमे ही प्रशासनाची मार्गदर्शक असल्याचे सांगितले. प्रशासनाने केलेल्या कामांचे समीक्षण माध्यमांनी करावे आणि जिथे चूक असेल तिथे ती ठळकपणे मांडावी, तसेच चांगल्या कामांचे कौतुकही करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. माझेही वडील पत्रकार होते, त्यामुळे पत्रकार आणि माध्यमांबद्दल विशेष आत्मीयता असल्याचे त्यांनी नमूद केले. 'आरंभ मराठी'चे दिवसाला चार लाख वाचक असल्याचे ऐकून आनंद झाल्याचे सांगत त्यांनी या दैनिकाने विकास पत्रकारितेद्वारे समाजासाठी दिशादर्शक कार्य केल्याचेही गौरविले. नगराध्यक्षा नेहा काकडे यांनी



शहराच्या विकासप्रक्रियेत माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत 'आरंभ मराठी'सारख्या दैनिकांनी विकासकामांमध्ये मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी दोन वर्षांच्या प्रवासाचे कौतुक करताना 'आरंभ मराठी'ने माध्यम क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केल्याचे नमूद केले. कार्यक्रमादरम्यान 'आरंभ मराठी'च्या सर्व प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच धाराशिव शहर व जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी वर्धापन दिनानिमित्त उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले, तर आभार कार्यकारी संपादक सज्जन यादव यांनी मानले.



# द्वितीय वर्धापन दिनानिमित्त दैनिक 'आरंभ मराठी' वर कौतुकाचा वर्षाव





































































गायक व संगीतकार
खंडेराव मळे


..अखेर पिंपरीच्या रखडलेल्या शाळा ईमारतीचे काम सुरु


डीआयसी रोडवर अपघातांची मालिका कायम
नियमबाह्य गतिरोधक काढले पण नियमातले कधी बसणार?



















## पाण्याचे योग्य नियोजन आणि लोकसहभागातूनच धाराशिव जिल्हा समृद्ध होणार

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे प्रतिपादन




जागतिक जलदिन समारं

आरंभ मराठी / धाराशिव

जिल्ह्यात जलसंधारण व
काम करण्याची गरज असून “जिथे पाणी वाढते, तेथे समृद्धी वाढते” याच्या
अनुषंगाने व्यापक विचारमंथ योग्य नियोजन
व लोकसभागातून जिल्हा ज ल्हाधिकारी
कीर्ती किरण पुजार यांनी के शिव व मृद व
जलसंधारण विभाग जिल्हा ने सोमवारी
जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे संपूर्णतः अभियान २.० अंतर्गत आयोजित
जागतिक जलदिन समारंभ व कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून पुजार बोलत
होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ.मैनाक घोष, जल योद्धा हनुमंत केंद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी



## शासकीय जाहिरात दरवाढीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे आंदोलन

आरंभ मराठी / धाराशिव



राज्यातील वृत्तपत्र उद्योगात
देण्यासाठी शासकीय जाहि
150 टक्के वाढ करावी, य
व्हॉईस ऑफ मीडियाने रा
केले आहे. याबाबत संघट
फडणवीस यांना निवेदन स
निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, 2019 पासून

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात उद्या टाटा मोटर्सतर्फे परिसर मुलाखतीचे आयोजन

आरंभ मराठी / धाराशिव

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्लेसमेंट व प्रशिक्षण केंद्राच्या वतीने नामांकित टाटा मोटर्स कंपनीच्या परिसर मुलाखतीचे आयोजन उद्या (दि.२५) सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी

## तुळजाभवानी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद उत्साहात

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील तुळजाभवानी महाविद्यालय येथे वाणिज्य, व्यवस्थापन व अर्थशास्त्रातील “रिसेंट ट्रेंड” या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद १८ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने उत्साहात पार पडली. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा. अरुण खरात (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर

## तेरणा कॉलेजच्या फार्मसी विभागाचा प्लेसमेंटमध्ये ठसा ; ४५ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

आरंभ मराठी / धाराशिव




लेल्या तेरणा
फार्मसी
ांची पुणे येथील
पनीत निवड
महाविद्यालय

## परंडा येथे रमाई घरकुल योजनेतून गरजू कु निवाऱ्याचा दिलासा

आरंभ मराठी / परंडा



शासनाच्या रमाई घरकुल आवास योजने
शहरातील इंदिरा नगर झोपडपट्टीलगत राह
अरुणा प्रभाकर भालेराव यांच्या घरकुल
बांधकामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पा
सामाजिक न्याय विभागाचे मा. जिल्हाध्य
तथा माजी नगरसेवक राहुल बनसोडे यांच
हस्ते करण्यात आला. जनशक्ती नगर वि

## अनाळा ग्रामस्थांची दोन दिवसीय तीर्थयात्रा उत्साहात

आरंभ मराठी / परंडा



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
तीर्थाटन योजनेअंतर्गत परंडा तालु
अनाळा येथील ग्रामस्थांची दोन दि
तीर्थयात्रा उत्साहात व आनंददायी
पार पडली. दिनांक २२ व २३ मार्च
आयोजित या यात्रेत भाविकांनी विविध पवित्र
तीर्थक्षेत्रांना भेट देत आध्यात्मिक समाधानाचा

## श्रीराम नवमी व चैत्र नवरात्रीनिमित्त धाराशिवमध्ये भव्य देवी गोंधळ; शिव तांडव पठणाने भाविक मंत्रमुग्ध

आरंभ मराठी / धाराशिव



धाराशिव शहरात प्रथमच कालि
महाराज यांच्या प्रमुख उपस्थित
व चैत्र नवरात्री निमित्त भव्य दे
व शिव तांडव स्तोत्र पठणाचा
(दि.२२) सायंकाळी लेडीज क्लब मैदानावर
अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न

## अपयशातून शिकत यशाकडे वाटचाल करा – उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी

डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज शाळेत
नवोदय गुणवंत




आरंभ मराठी /

स्पर्धा परीक्षेत
अपयश, पण
चुकांतून शिकणे हाच खरा यशाचा राजमार्ग
असतो. नवोदय विद्यालयात निवड होणे ही